


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २९५ •रविवार,दि.२५ जानेवारी २०२६ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# ईडीच्या केसमध्ये भुजबळांना क्लीन चीट

## दमानियांचा फडणवीसांवर संताप; म्हणाल्या, मी हायकोर्टात जाणार

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांची महाराष्ट्र सदन घोटाळ्यात एसीबीनंतर आता ईडीच्या केसमध्येही निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. त्यावरुन, आता राजकीय प्रतिक्रिया येत असून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही आपली भूमिका मांडली आहे. छगन भुजबळांवरील एक प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे, त्यांना कुठलीही क्लीन चीट मिळाली नसून आपण उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचंही अंजली दमानिया यांनी म्हटलं. तसेच, छगन भुजबळ यांना मागच्या आणि आत्ताच्या दोन्ही सरकारने वाचवलं आहे. फडणवीस भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन पुढे जात आहेत, असा गंभीर आरोपही दमानिया यांनी केला.

सक्तवसुली संचालनालय भुजबळ यांच्याविरुद्ध मनी लॉन्ड्रिंगच्या प्रकरणाचा तपास करत होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी कोणतीही निविदा न मागवता 'के.एस. चामणकर एंटरप्राइजेस'ला कंत्राट दिले असा आरोप करण्यात आला होता. छगन भुजबळ आणि इतरांनी निर्दोष मुक्ततेसाठी केलेला अर्ज




कोर्टाने मंजूर केला आहे. मात्र, अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेऊन संबंधित प्रकरणावर आणि निर्णयावर भाष्य केलं आहे.

छगन भुजबळांविरुद्ध २०१४ ला जनहित याचिका दाखल केल्यापासून माझा लढा सुरू आहे. एकूण ११ घोटाळे आणि त्यातून मिळणारे पैसे यासंदर्भात आम्ही जनहित याचिका दाखल केली होती. तीन गुन्हे दाखल झाले, आतापर्यंत दोन गुन्ह्यांमध्ये दिलासा मिळाला आहे, एक गुन्हा बाकी आहे. कोर्टाला योग्य ती माहिती न दिल्यामुळे गुन्हे रद्द केले असतील, मी मुख्य न्यायमूर्तींकडे यासंदर्भात पत्र लिहिणार आहे. कलिना सेंट्रल लायब्ररीचं प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे, अद्याप छगन भुजबळांना क्लीन चीट नाही, असे म्हणत आपण उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी म्हटलं.

आता देशाच्या सरन्यायाधीश न्यायवृंद तसेच मुख्यमंत्र्यांना देखील मी पत्र लिहिणार आहे. मी या निर्णयावर स्थगिती देण्याची मागणी मुंबई उच्च न्यायालयात करणार आहे. एसीबीने अपील करणं अपेक्षित होतं, मात्र सगळे एका माळेचे मणी आहेत. उद्धव ठाकरे सरकारने ३१ मार्च २०२२ ला शासन निर्णय रद्द करण्यासाठी दुसरा शासन निर्णय काढला. एप्रिल २०२३ मध्ये पुन्हा एक शासन निर्णय काढून अपिलमध्ये जाण्याचा शासन निर्णय काढला. मात्र, महाराष्ट्र सदन घोटाळ्याचं प्रकरण अद्याप संपल नाही. सगळ्या सरकारांनी त्यांना वाचवलं, आधी ठाकरेंनी वाचवलं मग फडणवीसांनी वाचवलं, असे म्हणत अंजली दमानियांनी दोन्ही सरकार भुजबळांच्या पाठीशी असल्याचं ▶ उर्वरित पान २ वर

### फडणवीस सगळ्या भ्रष्टाचारांना घेऊन पुढे जात आहेत : दमानिया

**पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन, सगळे घोटाळे हे देवेंद्र फडणवीस यांनी संपुष्टात आणले आहेत. त्यासाठी त्यांना महाराष्ट्र कधी माफ करणार नाही. ईडीच्या आरोपपत्राचे सगळे पुरावे आहेत, प्रत्येकाचा जबाब दिला आहे, तरी असा निर्णय आला हे दुर्दैवी आहे. भाजपची ही मोडस ऑपरेंडी आहे, आधी आरोप करा त्यांच्या मागे तपास यंत्रणा लावा आणि त्यांना पक्षात घ्या. फडणवीस यांनी भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्राचा नारा दिला होता आणि आज हेच फडणवीस सगळ्या भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन पुढे जात आहेत. आता कित्येक पटींनी लूट सुरू आहे. त्यामुळे, फडणवीस यांनी महाराष्ट्राला याचं उत्तर द्यावं. सध्या राज्यात केवळ बोली लावण्याचं राजकारण सुरू आहे, असे म्हणत दमानिया यांनी फडणवीसांनाही सवाल केले आहेत.**



*माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी श्री क्षेत्र भगवानगड येथे जाऊन ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा यांच्या समाधीचे, तसेच संत भीमसिंह महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्याचबरोबर गडाचे महंत ह.भ.प. न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे दर्शन व आशीर्वाद घेतले. यावेळी महंत नामदेव शास्त्री व धनंजय मुंडे यांनी एकत्रित गडावर सुरू असलेल्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या भव्य मंदिर उभारणी, तसेच विद्यार्थी भवन व अन्य विकासकामांची पाहणी केली.*

# पत्नीचा हार्ट अटॅक ने मृत्यूचा बनाव, खून केला अंत्यसंस्काराची तयारी पण पोलिसांनी प्लॅनिंग उधळली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शेतात सालगडी म्हणून काम करणाऱ्याने पत्नीचा डोक्यात काठीने वार करून निर्घृण खून केला. त्यानंतर तिचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचा बनाव रचून मृतदेह अंत्यसंस्कारासाठी गावी नेला.मात्र, बर्दापूर पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा बनाव उघड झाला. अंत्यविधीच्या पूर्वीच मृतदेहासह बनाव करणाऱ्या पतीला ताब्यात घेण्यात आले आहे. ही खळबळजनक घटना



अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हातोला शिवारात घडली आहे. शीलाबाई सुरेश शेरफुले वय ४५ वर्ष, रा. आलुरा, ता. देगलूर, जि. नांदेड असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश शेरफुले हा हातोला येथील एका शेतकऱ्याच्या शेतात सालगडी म्हणून काम करण्यासाठी त्याच्या पत्नीसह राहत होता. मागील ३-४ दिवसांपासून तो गावाकडे जाऊ म्हणून पत्नीकडे आग्रह धरत होता, परंतु ती तयार नव्हती. याच कारणावरून दोघांत तीव्र वाद झाला असल्याची चर्चा आहे. रागाच्या भरात सुरेशने जाड भरीव काठीने शीलाबाईच्या डोक्यात एकामागून एक अनेक वार केले. या हल्ल्यात शीलाबाई ▶ उर्वरित पान २ वर

# आ. नमिता मुंदडा यांनी नगर परिषदेत घेतली आढावा बैठक

## शहरातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यावर चर्चा ; प्रशासन लोकाभिमुख करण्यासाठी फेसबुक पेज, वेबसाईट तयार करण्याच्या सूचना



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आज शुक्रवारी नगर परिषदेत आमदार नमिता मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत नागरी सुविधा, पायाभूत विकास, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि वाहतूक कोंडी यांसारख्या शहराच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर सविस्तर ▶ उर्वरित पान २ वर

# एकही बंजारा तांडा विकासापासून वंचित राहणार नाही : अमरसिंह पंडित

## एक कोटी रुपये किंमतीच्या जांभळी तांडा रस्त्याचा भव्य शुभारंभ

**गेवराई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत बंजारा समाजाने शिवछत्र परिवाराला साथ दिली, प्रचाराच्या काळात आम्ही विकासकामांचा शब्द दिला होता, तो पूर्ण करण्याचे काम आता सुरु झाले असून सभामंडप, अंगणवाडी, शाळा बांधकाम, रस्ते, विज, पाणी अशा मुलभूत सुविधांसंदर्भातील विकासकामे सध्या अनेक तांड्यांवर सुरु आहेत.



तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायती मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केले आहेत. गेवराई विधानसभा मतदारसंघातील कोणताही बंजारा तांडा विकासापासून वंचित राहणार नाही असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. जांभळी तांड्याला जोडणाऱ्या एक कोटी रुपये किंमतीच्या रस्ता कामाचा शुभारंभ करताना ते बोलत होते.

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत ठाकर आडगांव ते जांभळीतांडा या एक कोटी रुपये किंमतीच्या रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरण, मौजे कुंभेजळगाव, राजपिंप्री, ▶ उर्वरित पान २ वर

# बिदुसरा धरणाच्या परिसरात घाणीचे साम्राज्य! परिसरातील अस्वच्छतेमुळे पर्यटकांची नाराजी

## जलसंपदा विभागाचे दुर्लक्ष ; तात्काळ स्वच्छता न राबविलास जलसंपदा कार्यालयासमोर आंदोलन ! मनसेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**


बीड शहराला मागील अनेक दशकापासून पाणीपुरवठा करणारे पाली गावाजवळी बिंदुसरा धरण हे राष्ट्रीय महामार्गावर असल्याने या ठिकाणाहून प्रवास करणारे अनेक प्रवासी व बीड शहरातील पर्यटन प्रेमी मोठ्या प्रमाणात या ठिकाणी पिकनिक करण्यासाठी व धरण पाहणसाठी येतात. या धरण परिसरात मोठ्या प्रमाणात



घाणीचे साम्राज्य पसरले असून, पाली धरणाची देखभाल दुरुस्ती व स्वच्छतेची जबाबदारी असणारे जलसंपदा विभाग मात्र याकडे दुर्लक्ष करत असून येणाऱ्या पर्यटकांना मात्र धरणातील शुद्ध पाणी पाहण्याऐवजी घाणीचे दर्शन होत आहे. या गंभीर बाबीकडे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष न दिल्यास जलसंपदा विभागाच्या कार्यालयासमोर मनसेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा मनसेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी दिला आहे.पाली गावाजवळ सोलापूर बीड राष्ट्रीय ▶ उर्वरित पान २ वर

# तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या तरुणाचा बिंदुसरा धरणात मृतदेह आढळला

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहराजवळील बिंदुसरा प्रकल्प परिसरात आज सकाळी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मागील तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या एका २३ वर्षीय तरुणाचा मृतदेह धरणाच्या पाण्यात आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. संकेत तुकाराम नवले (वय २३, रा. पाली, ता. बीड) असे मृत तरुणाचे नाव असून, या घटनेमुळे पाली गावावर मोठी शोककळा पसरली आहे. संकेत नवले हा दोन दिवसांपूर्वी आपल्या घरातून काही सांगून बाहेर पडला होता. मात्र, रात्र झाली तरी ▶ उर्वरित पान २ वर




# नवनित कांवत साहेब, डोळे उघडा आणि नीट पाहा !

## सर्वसामान्यांना हेल्मेट नियमांची सक्ती ; मात्र पोलिसांकडूनच नियमांची ऐसी की तैसी ! पोलीस अधीक्षकांना निवेदन : डॉ. गणेश ढवळे



**बीड । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत दि. १९ जानेवारी २०२६ पासून जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दुचाकी चालवताना हेल्मेट वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे. याबाबतचे स्पष्ट आदेश स्वतः बीडचे पोलीस अधीक्षक मा. नवनित कांवत यांनी जिल्हा प्रशासनाला निर्गमित केले आहेत.

या आदेशाच्या पहिल्याच दिवशी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १८० शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करून त्यांच्याकडून एकूण १ लाख ८० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती विविध दैनिकांत प्रसिद्ध झाली आहे. मात्र, अत्यंत खेदाची बाब म्हणजे पोलीस अधीक्षकांच्या आदेशांनाच केराची टोपली दाखवत पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी स्वतः विना हेल्मेट बिनधास्तपणे दुचाकी चालवत असल्याचे चित्र बीड जिल्ह्यात सर्रास दिसून येत आहे. यामुळे हेल्मेट सक्तीच्या नियमांचीच नव्हे, तर कायद्याचीही खुलेआम पायमल्ली होत असल्याचे स्पष्ट होत आहे. सर्वसामान्य नागरिकांवर नियमांची कठोर अंमलबजावणी केली जात असताना, तेच नियम राबविणाऱ्या यंत्रणेकडूनच त्यांचे उल्लंघन होणे हे लोकशाही मूल्यांना आणि प्रशासनाच्या विश्वासार्हतेला तडा देणारे आहे. या दुटप्पी भूमिकेमुळे जिल्हा प्रशासनाचा दुहेरी निकषांचा चेहरा उघड होत आहे. तरी, पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या नियमभंगास आळा घालून हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी सर्वांसाठी समान आणि प्रभावीपणे राबवावी, तसेच नियम मोडणाऱ्या संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे मा. पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे केली आहे.

# शिक्षण : मानवी विकास आणि समाजपरिवर्तनाचा मूलाधार

दरवर्षी २४ जानेवारी रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन हा केवळ शिक्षण क्षेत्राशी संबंधित व्यक्तींसाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवी समाजासाठी आत्मपरीक्षणाचा, चिंतनाचा आणि नव्या दिशेने वाटचाल करण्याचा दिवस आहे. शिक्षण ही संकल्पना केवळ शाळा, महाविद्यालये, परीक्षा, प्रमाणपत्रे किंवा रोजगार यापुरती मर्यादित नसून ती मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्याशी आणि समाजाच्या प्रत्येक घटकाशी अतूटपणे जोडलेली आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता शिक्षण ही एक प्रभावी सामाजिक संस्था आहे, जी समाजाची रचना घडवते, मूल्यव्यवस्था निर्माण करते, सामाजिक विषमता कमी अथवा अधिक करू शकते आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती देते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन हा शिक्षणाच्या व्यापक सामाजिक भूमिकेचा पुनर्विचार करण्याची अत्यंत महत्त्वाची संधी ठरतो.

मानवी समाजाच्या उत्क्रांतीत शिक्षणाची भूमिका मूलभूत राहिलेली आहे. आदिम समाजात शिक्षण औपचारिक स्वरूपात नसले तरी अनुभव, निरीक्षण, अनुकरण आणि मौखिक परंपरेद्वारे ज्ञानाची देवाणघेवाण होत असे. शिकारीच्या पद्धती, शेतीची कौशल्ये, सामाजिक नियम, धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक परंपरा या सर्व गोष्टी समाजातील वृद्धांकडून तरुण पिढीकडे शिक्षणाच्या माध्यमातूनच पोहोचत. जसजसा समाज अधिक संघटित आणि गुंतागुंतीचा होत गेला, तसतसे शिक्षणाचे स्वरूपही बदलत गेले. गुरुकुल पद्धती, विहार, मदरसे, चर्च स्कूल्स आणि प्राचीन विद्यापीठे ही शिक्षणाच्या सामाजिक गरजांतूनच निर्माण झालेली उदाहरणे आहेत. आधुनिक राष्ट्रराज्यांच्या उदयानंतर शिक्षण अधिक औपचारिक, संरचित आणि सार्वत्रिक बनले. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की शिक्षण ही समाजनिर्मित संस्था असल्यामुळे समाजातील आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदलांचे प्रतिबिंब शिक्षणव्यवस्थेत उमटत राहते.

शिक्षण आणि समाज यांचे नाते परस्परावलंबी आहे. समाज शिक्षणाच्या उद्दिष्टांवर, अभ्यासक्रमावर आणि शैक्षणिक मूल्यांवर प्रभाव टाकतो, तर शिक्षण समाजातील विचारसरणी, जीवनशैली आणि सामाजिक संबंध घडवते. उदाहरणार्थ, पारंपरिक समाजात आज्ञाधारकता, परंपरापालन आणि सामाजिक भूमिकांचे पालन यावर भर दिला जात असे, तर आधुनिक समाजात तर्कशुद्ध विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, व्यक्तिस्वातंत्र्य आणि नवोन्मेष यांना महत्त्व दिले जाते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, शिक्षण ही तटस्थ प्रक्रिया नसून ती अनेकदा सत्ताधारी वर्गांच्या मूल्यांची पुनरुत्पत्ती करणारी यंत्रणा ठरू शकते. त्यामुळे शिक्षणव्यवस्थेचे चिकित्सक विश्लेषण करणे हे लोकशाही समाजासाठी अत्यावश्यक ठरते.

शिक्षणाचे एक अत्यंत महत्त्वाचे सामाजिक कार्य म्हणजे समाजीकरण. कुटुंबानंतर शाळा ही व्यक्तीला समाजाचा जबाबदार घटक बनवणारी प्रमुख संस्था आहे. शाळेमध्ये विद्यार्थी शिस्त, सहकार्य, स्पर्धा, नियमांचे पालन, वेळेचे भान आणि सामाजिक जबाबदारी शिकतो. शिक्षक, सहाध्यायी आणि शालेय वातावरण यांच्या माध्यमातून समाजातील अपेक्षित वर्तनाचे संस्कार विद्यार्थ्यांवर होत जातात. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे स्पष्ट होते की समाजीकरणाची ही प्रक्रिया समाजातील स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असली तरी ती अनेकदा सामाजिक विषमता टिकवून ठेवण्याचे साधनही ठरते. कारण प्रस्थापित मूल्ये, भाषा आणि सत्तासंबंध शिक्षणाच्या माध्यमातून पुढील पिढीकडे हस्तांतरित होतात.

शिक्षण हे सामाजिक गतिशीलतेचे प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणाच्या आधारे व्यक्तीला उच्च सामाजिक, आर्थिक आणि व्यावसायिक स्थान मिळू शकते, अशी सर्वसाधारण धारणा आहे. अनेक समाजांमध्ये शिक्षणामुळे गरिबी, अज्ञान आणि सामाजिक बहिष्कारातून बाहेर पडण्याच्या संधी निर्माण झालेल्या दिसतात. मात्र समाजशास्त्रीय अभ्यास असे दर्शवतो की शिक्षणव्यवस्था सर्वांना समान संधी देतेच असे नाही. आर्थिक स्थिती, सामाजिक पार्श्वभूमी, भाषिक कौशल्ये, सांस्कृतिक भांडवल आणि कौटुंबिक आधार या घटकांचा शिक्षणातील यशावर मोठा प्रभाव असतो. त्यामुळे शिक्षण हे सामाजिक गतिशीलतेचे साधन असले तरी ते आपोआप सामाजिक समता निर्माण करतेच असे नाही, हे वास्तव स्वीकारणे आवश्यक आहे.

लिंगभेद आणि शिक्षण यांचा संबंध समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे. इतिहास पाहता अनेक समाजांमध्ये स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले. स्त्री शिक्षित झाली तर ती प्रश्न विचारेल, निर्णय घेईल आणि सत्तासंबंधांना आव्हान देईल, या भीतीतून शिक्षणावर निर्बंध घालण्यात आले. आधुनिक काळात स्त्रीशिक्षणाने समाजात मूलभूत बदल घडवून आणले आहेत. स्त्रीशिक्षणामुळे आरोग्यविषयक जागरूकता वाढली, मातामृत्यू दर कमी झाला, बालविवाहास आळा बसला आणि महिलांचा आर्थिक व सामाजिक सहभाग वाढला. तरीही आजही अनेक भागांमध्ये सामाजिक रूढी, आर्थिक अडचणी, सुरक्षिततेचे प्रश्न आणि घरगुती जबाबदाऱ्या यांमुळे मुलींच्या शिक्षणास अडथळे निर्माण होतात. आंतरराष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त लिंगसमतेच्या दृष्टीने शिक्षणव्यवस्थेचे पुनर्मूल्यांकन करणे अत्यावश्यक आहे.

भारतीय समाजाच्या संदर्भात जात, वर्ग आणि शिक्षण यांचा परस्परसंबंध विशेष महत्त्वाचा ठरतो. पारंपरिक जातीय व्यवस्थेमुळे काही समूहांना ज्ञानसंपादनापासून दूर ठेवण्यात आले, तर काहींना शिक्षणाचे विशेषाधिकार मिळाले. आधुनिक शिक्षणव्यवस्थेने कायदेशीरदृष्ट्या समान संधी देण्याचा प्रयत्न केला असला तरी सामाजिक वास्तवात असमानता आजही प्रकर्षाने दिसते. आर्थिक दुर्बलता, सामाजिक भेदभाव, गुणवत्तापूर्ण शिक्षणसंस्थांचा अभाव आणि शैक्षणिक साधनांची कमतरता यांमुळे अनेक विद्यार्थी शिक्षणप्रवाहातून गळून पडतात. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून शिक्षण धोरणे आखताना या संरचनात्मक अडचणींचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

शिक्षण आणि आर्थिक विकास यांचे नाते अतिशय निकटचे आहे. सुशिक्षित मनुष्यबळ हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचे मुख्य भांडवल असते. शिक्षणामुळे कौशल्ये विकसित होतात, उत्पादकता वाढते आणि नवोन्मेषाला चालना मिळते. मात्र समाजशास्त्र असे स्पष्टपणे सांगते की केवळ रोजगाराभिमुख शिक्षणावर भर दिल्यास मानवी मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि नैतिक जाणीवा दुर्लक्षित होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे शिक्षणाने आर्थिक विकासासोबतच सामाजिक न्याय, समता, सहिष्णुता आणि सहअस्तित्वाची मूल्येही जोपासली पाहिजेत.

लोकशाही समाजात शिक्षणाची भूमिका अत्यंत मोलाची आहे. शिक्षणामुळे नागरिकांना हक्क आणि कर्तव्यांची जाणीव होते, चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित होते आणि सत्तेवर प्रश्न विचारण्याचे धैर्य मिळते. सुशिक्षित नागरिकच सामाजिक अन्याय, भ्रष्टाचार आणि भेदभावाविरुद्ध संघटितपणे उभे राहू शकतात. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, शिक्षणाशिवाय लोकशाही ही केवळ औपचारिक व्यवस्था ठरते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन हा लोकशाही मूल्यांच्या दृढीकरणाशी थेट जोडलेला आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि डिजिटल क्रांतीच्या युगात शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल वर्गखोल्या, मुक्त ज्ञानस्रोत आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे शिक्षणाच्या संधी विस्तारल्या आहेत. मात्र डिजिटल दरीमुळे ग्रामीण, गरीब आणि वंचित घटक या संधींपासून दूर राहतात. समाजशास्त्रीय विश्लेषण असे दर्शवते की तंत्रज्ञान हे तटस्थ नसून विद्यमान सामाजिक विषमता अधिक तीव्र करू शकते, जर त्याचा वापर समताधिष्ठित पद्धतीने झाला नाही तर. त्यामुळे डिजिटल शिक्षणाचा विस्तार करताना सामाजिक समावेशन हा केंद्रबिंदू असला पाहिजे.

शिक्षण आणि संस्कृती यांचा संबंधही अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षणाच्या माध्यमातून भाषा, इतिहास, परंपरा आणि सांस्कृतिक ओळख पुढील पिढीकडे हस्तांतरित होते. मात्र एकसाची अभ्यासक्रम रचना स्थानिक संस्कृती, आदिवासी ज्ञानपरंपरा आणि लोकानुभव दुर्लक्षित करू शकते. समाजशास्त्र सांगते की बहुसांस्कृतिक समाजात शिक्षणाने विविधतेचा सन्मान केला पाहिजे. स्थानिक ज्ञान आणि लोकसंस्कृतीचा समावेश झाल्यास शिक्षण अधिक समावेशक, अर्थपूर्ण आणि जीवनाभिमुख ठरते.

संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणाला मूलभूत मानवी हक्क म्हणून मान्यता दिली आहे. शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. शिक्षणाशिवाय दारिद्र्य निर्मूलन, लैंगिक समानता, आरोग्य सुधारणा आणि पर्यावरणीय शाश्वतता साध्य होऊ शकत नाही. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, शिक्षण हे इतर सर्व विकास उद्दिष्टांचे अधिष्ठान आहे.

आज शिक्षण क्षेत्रासमोर गुणवत्तेतील तफावत, शिक्षकांची कमतरता, अभ्यासक्रमातील कालबाह्यता, परीक्षा-केंद्रित दृष्टिकोन आणि विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण यांसारखी अनेक आव्हाने उभी आहेत. शिक्षण सुधारणा म्हणजे केवळ इमारती उभारणे किंवा तंत्रज्ञान आणणे नव्हे, तर संपूर्ण सामाजिक दृष्टिकोनात परिवर्तन घडवणे होय. शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे नसून सामाजिक मूल्यांचे वाहक असतात. त्यामुळे शिक्षक प्रशिक्षणात समाजशास्त्रीय समज, संवेदनशीलता आणि समतावादी दृष्टिकोन विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे.

शेवटी असे ठामपणे म्हणता येईल की शिक्षण ही समाजपरिवर्तनाची सर्वात प्रभावी शक्ती आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून शिक्षणाकडे पाहिल्यास त्यातील संधी, मर्यादा आणि जबाबदाऱ्या अधिक स्पष्टपणे समजतात. आंतरराष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त आपण शिक्षणाला केवळ वैयक्तिक यशाचे साधन न मानता सामाजिक न्याय, समता, लोकशाही आणि मानवी मूल्यांची जोपासना करणारी प्रक्रिया म्हणून स्वीकारले पाहिजे. सर्वसमावेशक, गुणवत्तापूर्ण आणि संवेदनशील शिक्षणव्यवस्थेतच एका समताधिष्ठित, सुसंस्कृत आणि शाश्वत समाजाचे भविष्य दडलेले आहे.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान १ वरून पुढे...

## ईडीच्या केसमध्ये...

त्यांनी म्हटलं. दरम्यान, याप्रकरणी, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने असा दावा केला होता की, सरकारी कर्मचाऱ्यांनी अहवालात चुकीची माहिती दिली आणि बनावट ताळेबंद तयार केला. विकासकाला १.३३ टक्के नफा होणार असल्याचे दाखवण्यात आले, मात्र प्रत्यक्षात तो ३६५.३६ टक्के होता, असा एसीबीचा आरोप होता.

## पत्नीचा हार्ट...

रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर सुरेशने हा खून पचवण्यासाठी परिसरातील लोकांना आणि गावाकडे नातेवाईकांना शीलाबाईचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याचे खोटे सांगितले. गुन्हा लपवण्यासाठी सुरेशने तातडीने एक क्रुझर गाडी भाड्याने केली आणि मृतदेह घेऊन थेट देगलूर तालुक्यातील आलुरा गाठले. मात्र, बर्दापूर पोलिसांना या संशयास्पद मृत्यूची गुप्त माहिती मिळाली. बर्दापूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक कांबळे यांनी वेळ न घालवता देगलूर पोलिसांशी संपर्क साधला. देगलूरचे पोलीस उपनिरीक्षक गोपाळ सूर्यवंशी यांनी तातडीने आलुरा गाव गाठले. तिथे शीलाबाईच्या माहेरच्या लोकांनाही डोक्यावरील जखमा पाहून संशय आला होता. पोलिसांनी अंत्यसंस्कारापूर्वीच मृतदेह ताब्यात घेऊन पती सुरेशला ताब्यात घेतले. सुरेश शेरफुले हा सध्या संशयित आरोपी हा अखेर बर्दापूर पोलिसांच्या ताब्यात असून मृतदेह शवविच्छेदनासाठी अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरु असून त्यानंतर या गुन्ह्यात आणखी खुलासे समोर येतात का तसेच या घटनेमागचे नेमके कारण स्पष्ट होऊ शकलेले नाही. या घटनेचा अधिक तपास बर्दापूर पोलीस करित आहेत.

## आ. नमिता मुंदडा...

चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी प्रभावी आणि दीर्घकालीन उपाययोजना राबवण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला. या प्रसंगी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा, नगरसेवक आणि नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

◆ पान १ वरून पुढे...

शहरातील वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पाटील चौक हा मार्ग 'वन वे' करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यासोबतच मंडी बाजार, तसेच योगेश्वरी प्राथमिक शाळा ते महाराष्ट्र बँकेपर्यंतच्या रस्त्यावर पी-१ आणि पी-२ पार्किंग व्यवस्था लागू करण्याबाबतचे नियोजन मांडण्यात आले. या संदर्भातील तांत्रिक बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यासाठी लवकरच उपविभागीय अधिकारी, पोलीस विभाग आणि नगर पालिका यांची संयुक्त बैठक बोलावण्यात येईल, असे आमदार नमिता मुंदडा यांनी यावेळी स्पष्ट केले. नगर परिषदेचे कामकाज अधिक पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी आणि महत्त्वाच्या सूचना देण्यासाठी नगर परिषदेचे अधिकृत फेसबुक पेज सुरू करण्यासह पालिकेची नवीन वेबसाईट तयार करण्यात येणार आहे. शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वच्छतेचे कंत्राट नव्याने काढण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला. तसेच शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शेल्टर हाऊस उभारण्याचे नियोजन प्रगतीपथावर असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. प्रशासकीय शिस्त आणि आर्थिक बाबींवर भाष्य करताना नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी कर्मचाऱ्यांना वसुली वाढवण्याचे आदेश दिले. नगर परिषदेचे व्यवस्थापन, विद्युत बिले आणि कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने कर वसुलीवर अधिक भर देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत कडक पावले उचलण्यात आली असून, लवकरच कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य करण्यात येणार आहे. सोबतच सर्व कर्मचाऱ्यांना कार्यालयात ड्रेस कोड पाळणे आणि ओळखपत्र सोबत ठेवणे बंधनकारक केले आहे. २६ जानेवारीपूर्वी नगर परिषदेत येणाऱ्या नागरिकांसाठी बैठक व्यवस्था आणि फिल्टर पाण्याची सोय करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

## एकही बंजारा...

जोडवाडी येथील ६० लक्ष रुपये किंमतीच्या बंधाऱ्याचे, मौजे जोडवाडी व सैदापूर येथील २३ लक्ष रुपये किंमतीच्या अंगणवाडी बांधकामासह

◆ पान १ वरून पुढे...

९७ लक्ष रुपये किंमतीच्या पाणीपुरवठा योजनेचा भव्य शुभारंभ शनिवार, दि.२४ जानेवारी रोजी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार, माजी सभापती कुमारराव ढाकणे, जगन्नाथ काळे, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पांढरे, किसान सेलचे तालुकाध्यक्ष सुभाष मस्के, बाजार समितीचे संचालक बाबुराव जाधव, खरेदी विक्री संघाचे सदस्य देवराव यमगर, सरपंच रविंद्र गाडे, विलास चव्हाण, परमेश्वर खरात यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी ठिकठिकाणी माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे ग्रामस्थांनी भव्य स्वागत केले. अमरसिंह पंडित यांनी बंजारा समाजातील महिला व नागरिकांशी सुसंवाद साधला. विविध विकासकामांचे काम दर्जेदार करण्यात येतील त्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी चेअरमन शंकर पवार, विठ्ठल राठोड, जानू पवार, भानुदास महाराज राठोड, लहु सामजी, बाळु राठोड, सुभाष राठोड, जालिंदर राठोड, रोहिदास राठोड, अनिल पवार, कचरु पवार, लहू पवार, मोतिराम राठोड, विलास पवार, संजय पवार, पांडुरंग राठोड, बन्सी जाधव, नंदकुमार पवार, सरपंच सिद्धेश्वर काळे, शेषेराव पवार, सुधाकर कोकाट, आरुण कोकाटे साळिकराम चव्हाण परमेश्वर कोकाट, संदिपान कोकाटे, एकनाथ काळे शिवनाथ काळे, अच्युत कोकाट, सतिश चव्हाण, कालिदास चव्हाण यांच्यासह ठाकर आडगाव, जांभळी तांडा येथील नागरिक तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिदुसरा धरणाच्या...

महामार्गावर बीड शहराला गेल्या अनेक दशकापासून पिण्याचे पाणी पुरवणारे बिंदुसरा धरण घाणीच्या विळख्यात सापडले आहे. परिसरात सर्वत्र धरण किनाऱ्यावर घाण पसरली असून याची स्वच्छतेची जबाबदारी असणारे जलसंपदा व विभाग मात्र याकडे दुर्लक्ष करत आहे, धरण दुरुस्ती व देखभाल साठी महाराष्ट्र शासन विशेष निधीची तरतूद करत आहेत, मात्र या निधीची वाट येथील अधिकारीच लावत आहेत, बीड शहरातून

◆ पान १ वरून पुढे...

व इतर जिल्ह्यातून पाली येथील बिंदूसरा धरण पाण्यासाठी या ठिकाणी निसर्गाचा आनंद घेण्यासाठी नागरिक येतात, परिसरातील घाण पाहून पर्यटक आपले नाक मुरडत असून या घाणीला साफ करण्याची जबाबदारी व स्वच्छता राबवण्याची जिम्मेदारी येथील जलसंपदा विभागावर असून याकडे जलसंपदा विभाग मात्र साफ दुर्लक्ष करत आहेत, तात्काळ बिंदुसरा धरणाच्या किनाऱ्यावरील घाण्याची विल्हेवाट न लावल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जलसंपदा विभागाच्या कार्यालयासमोर घंटा बजाव अधिकारी जगाव आंदोलन करण्यात येणार असल्याचा गंभीर इशारा मनसेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी दिला आहे.

## तीन दिवसांपासून...

तो घरी परतला नाही. कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला; नातेवाईकांकडे विचारपूस केली, परंतु त्याचा कुठेही पत्ता लागला नाही. संकेतचा फोनही लागत नसल्याने कुटुंबीयांची चिंता अधिकच वाढली होती. संकेतचा शोध घेत असताना बिंदुसरा धरणाच्या काठावर त्याचे कपडे आणि चप्पल आढळून आली होती. यामुळे काहीतरी अघटीत घडल्याची शक्यता ग्रामस्थांनी आणि कुटुंबीयांनी व्यक्त केली होती. त्या दृष्टीने गावकऱ्यांनी आणि प्रशासनाने परिसरात शोध मोहीम तीव्र केली. स्थानिक तरुणांनी आणि प्रशासकीय यंत्रणेने पाण्यात शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र कालपर्यंत यश आले नव्हते. अखेर आज शनिवारी सकाळी संकेतचा मृतदेह तलावाच्या पाण्यात तरंगताना आढळून आला. घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह पाण्याबाहेर काढून पंचनामा केला आहे. त्यानंतर मृतदेह तपासणीसाठी बीड येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. संकेतने हे टोकाचे पाऊल का उचलले? त्याच्या आत्महत्येचे नेमके कारण काय? याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. संकेत हा अवघ्या २३ वर्षांचा तरुण होता. त्याच्या अशा जाण्याने नवले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पाली गावातील एका उमद्या तरुणाचा असा अंत झाल्याने गावकऱ्यांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास बीड ग्रामीण पोलीस यांच्याकडून सुरू आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## मुख्यमंत्री देवाभाऊंनी....

असून हा प्रकल्प परळीच्या विकासात एक मैलाचा दगड ठरणार आहे. पहिल्या टप्प्यात ५० मेगा वॅट वीज निर्मिती क्षमता असलेल्या संचाची उभारणी करण्यात येणार असून याबाबतची निविदा महानिर्मितीने प्रसिद्ध केल्याने लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी ऊर्जामंत्री तथा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे समस्त परळीकरांच्या वतीने आभार मानले आहेत.

## दर्जेदार बंधारे...

लोकांच्या दैनंदिन जीवन आणि अर्थकारणावर सकारात्मक परिणाम होईल. रस्ते, नाली, पुल, लाईट तसेच या भागातील वाहून गेलेल्या बंधारे दुरुस्तीचे काम केले जाईल. ब्रम्हगाव, कुंभेजळगाव, रामनगर तांडा या ग्रुप ग्रामपंचायत विभागून प्रत्येक गावात स्वतंत्र ग्रामपंचायत करण्याचा विचार असून यामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळेल. कुंभेजळगाव येथील गावाला जोडणारा ५०० मिटरच्या रस्त्याचा प्रश्न सोडवला जाईल, त्याच बरोबर दलित समाजाच्या स्मशानभूमीचे काम लवकरच केले जाईल. गेवराईच्या दुष्काळी भागात आगामी काळात २२ बंधारे उभा करतोय. बंधा-यांचे काम दर्जेदार काम होईल. याचा फायदा या भागातील शेतकरी व नागरिकांना होईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामबप्पा लेंडगुळे यांनी करुन उपस्थितांचे आभार मानले. यावेळी कुभेजळगाव येथील उपसरपंच शेख सद्दाम, सुदाम लेंडगुळे, कल्याणराव पांगरे, लहुराव पांगरे, बळीराम पांगरे, भुजंगबापू पांगरे, महादेव पांगरे, हरी झेंडे, भिकाजी राठोड, रुस्तुम पांगरे, चेअरमन गणपत राठोड,

◆ पान ४ वरून पुढे...

अभिमान लेंडगुळे, उद्धव पांगरे, योगिराज चव्हाण, सुरेश पांगरे, संजय गायके, रामचंद्र पांगरे, पोपट चव्हाण, कोळगावचे सरपंच राजेंद्र कदम, अशोक करांडे तसेच राजपिंप्री येथे संतोष पानखडे, दिलीप पानखडे, बापु धोत्रे, गोरख म्हेत्रे, सुरेश पानखडे, विष्णू चव्हाण, विजय हराळे, सौ. विमल धोत्रे यांच्यासह कुंभेळगाव आणि राजपिंप्री येथील येथील नागरिक तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 14 वर्षाच्या मुलीचा...

PSI पल्लवी जाधव यांनी साई सिध्दी हॉलच्या मैनेजर कडे चौकशी केली असता, त्यांनी बुकिंग कामी घेतलेले वर-वधू चे वयाचे पुरावे दाखवले. ते पाहून असे समजले की मुलीचे वय जास्त दाखवण्यासाठी खोटे आधारकार्ड बनवले होते. ज्यात तिचे वय १९ दाखवण्यात आले होते. ते कागदपत्रे ताब्यात घेवून पोस्टेला जमा करण्यात आले. तसेच बालविवाहाचा गुन्हा दाखल करणेकामी सहायक बालविवाह प्रतिबंधात्मक अधिकारी तथा मुख्य सेविका,नामे रत्नमाला बाबूराव बारकुल, एकात्मक बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय बीड यांना घटनेची फोनद्वारे सर्व माहिती देवून पोस्टे गेवराई ला बोलावून घेतले. गेवराई येथे आल्यावर त्यांनी पीडितेशी संवाद साधून सर्व माहिती घेतली व पोस्टे गेवराई गुरनं ४७/२०२६ कलम ९, १०,११ बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये ५ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. झडख पल्लवी जाधव यांनी पीडित मुलीच्या काळजी व संरक्षणासाठी तिला बालकल्याण समिती बीड यांचे समक्ष हजर केले. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली, झडख पल्लवी जाधव, पोलीस

◆ पान ४ वरून पुढे...

हवालदार उषा चौरे, शोभा जाधव, प्रदीप येवले, अशोक शिंदे , पोशी गजानन चौधरी सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

## जगदीश गुरखुदे...

सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी गुरखुदे आणि देशपांडे हे अथक परिश्रम घेत असतात असे भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख म्हणाले.यावेळी काही लाभार्थींना आयुष्यमान कार्ड देण्यात आले. हे शिबीर शनिवारी दिवसभर चालू होते ज्याचा लाभ प्रभागातील नागरिकांना मोठ्या संख्येने घेतला. बीड शहरातील वार्ड क्रमांक ७ धोंडीपुरा येथे नगरसेवक जगदीश गुरखुदे आणि नगरसेवक भाग्यश्री सागर देशपांडे यांच्या माध्यमातून आयुष्यमान भारत योजना मोफत कार्ड वाटपचे शिबिर आयोजित करण्यात आले होते,याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात डॉ.सारिका क्षीरसागर यांनी नागरिकांशी संवाद साधला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख तर व्यासपीठावर नगरसेवक राणा चव्हाण,शांतीनाथ डोरले,लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर,महेश वाघमारे,लक्ष्मीकांत रुईकर,परशुराम गुरखुदे,अमोल वडतिले,महादेव नागरगोजे,विद्याभूषण बेदरकर,केशव बडे,राजकुमार जैन ,संतोष चिंचोलकर, यांच्यासह प्रभागातील नागरिकांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना महेश वाघमारे म्हणाले की, अडीअडचणीला धावून जाण्याच्या स्वभावातून गुरखुदे यांनी मोठे समाजकार्य उभे केले असून करोना काळात त्यांनी गोरगरीब आणि गरजवंताना घरपोच डबा पोहचवत मोठे पुण्यकर्म केले आहे असे यावेळी डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर यांनीही गुरखुदे आणि देशपांडे यांच्या कार्याचे कौतुक केले,आगामी काळात प्रभागात

◆ पान ४ वरून पुढे...

विकासकामे वेगाने होतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.यावेळी प्रभागातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## रेल्वे ट्रॅकने...

सुरक्षिततेचा व जगण्याच्या हक्काचा प्रश्न आहे. भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही शेतकरी वर्गाकडून देण्यात येत आहे. केवळ आश्वासनांवर वेळ न घालवता प्रत्यक्ष काम तात्काळ सुरू करावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

## पात्रुड मध्ये...

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड आणि पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पीएसआय सुशांत सुतळे, हवालदार मारोती कांबळे, सुनील अलगट, रामचंद्र केकान, गोविंद भताने, सचिन आंधळे, बिभीषण चव्हाण आणि चालक अतल हराळे यांचा सहभाग होता.

## रेल्वे भुसंपादन....

देतानाच रेल्वेचे कंत्राटदार कामे करत नसतील तर त्यांना समज द्या, कामे वेळेत करून घेण्यासाठी प्रयत्न करा पण या वर्षात रेल्वे परळीपर्यंत हायस्पिड धावलीच पाहिजे, अशा सुचनाही यावेळी अधिकाऱ्यांना दिल्या. रेल्वे हा बीडकरांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे, शिवाय माझ्यासाठी हा विषय महत्वाचा आहे. यामुळे रेल्वेचे काम पुर्ण करण्यासाठी रात्रंदिवस काम सुरू ठेवा, असेही खा.सोनवणे म्हणाले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# डोकेवाडा येथे अंगणवाडी इमारत बांधकामाचे भूमिपूजन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते संपन्न

## डोकेवाडा जोड रस्ता डांबरीकरण कामाला प्रथम प्राधान्य: राजेंद्र मस्के



**बीड । प्रतिनिधी**

लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोकेवाडा गावात लहान बालकांच्या शिक्षण, पोषण आणि संस्कारासाठी अत्यावश्यक असलेल्या नव्या अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते व हभप तुकाराम महाराज, हभप मोहन बाबा कदम महाराज, सरपंच बाप्पासाहेब कदम, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी फेडरेशन संचालक बद्रीनाथ जटाळ, सुग्रीव डोके,डोके बाबुराव मुकादम, माजी सरपंच ईश्वर वाळेकर, सदस्य देविदास वाघ,डोके किसन सौदागर, चंद्रसेन जाधव ,आसाराम डोके, अनिल अनपट, सस्ते आपाराव, बबनराव सस्ते, रमेश डोके ,शंकर डोके, किसनराव कदम, महादेव डोके, विलास कदम बजरंग डोके, युवराज कदम, सोमीनाथ डोके, श्रीराम कदम, लक्ष्मण डोके अभिमान डोके, रत्नाकर डोके ,रमेश डोके, राजेभाऊ डोके ,शिवाजी तुपे, भास्कर कदम, उपसरपंच बबलू भांडवलकर, सचिन मस्के, सतीश कळसुले अंकुश सस्ते, अरुण वाळेकर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के म्हणाले गावाचा खरा विकास म्हणजे पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी,लाईट आणि रस्ते यांचा समतोल विकास. ग्रामीण भागातअंगणवाडी ही मुलांच्या उज्वल भविष्यासाठीची पहिली शाळा आहे. या इमारतीमुळे डोकेवाडा गावात बालकांच्या भरण–पोषणा बरोबरच शिक्षण, बालसंस्काराची भक्कम पायाभरणी होईल. लिंबागणेश गटातील प्रत्येक गाव खेड्याला पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. विकास ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असुन. लोकांच्या मागणीप्रमाणे विविध विकास कामांना प्राधान्याने गती दिली जात आहे. डोकेवाडा जोड रस्ता डांबरीकरणाचे काम वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे असून यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून आपला शासनाकडे भक्कमपणे पाठपुरावा चालू आहे. या कामास निधीसह मंजूरी आणून भविष्यात या रस्त्याचे काम आपण पूर्ण करणार असल्याची ग्वाही यावेळी राजेंद्र मस्के यांनी ग्रामस्थांना दिली आहे.



*वडवणीतील सुप्रसिद्ध ॲड.महादेव खेडकर यांचे चि. ॲड.शिवदर्शन खेडकर व रामचंद्र सावंत यांची कन्या ॲड.श्रेया सावंत यांच्या शुभविवाह प्रसंगी उपस्थित राहून तिरुपती गार्डन आणि लॉन्स आदर्श नगर रस्ता क्र. ०२ आदर्श कॉलनी टिंगरे नगर एअरपोर्ट रोड पुणे, येथे विवाह मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी ॲड. टी. ए. शेख, ॲड. महादेव खेडकर, अध्यक्ष ॲड तुकाराम आडे, श्रीराम लंगे, बाळासाहेब घुगे, ॲड. सुग्रीव कदम, ॲड भास्कर उजगरे, ॲड. महादेव आडे, ॲड. सतिश खिरे, ॲड पि.के तिडके, ॲड. प्रताप उजगरे, पत्रकार संभाजी लांडे, लक्ष्मण कोटुळे, गवळी इत्यादि उपस्थित होते.*

# लोकशाही बळकटीसाठी आदित्य पॉलिटेक्निकमध्ये मतदानाची शपथ

## आदित्य पॉलिटेक्निकमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणाऱ्या उपक्रमाने राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयात २३ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणाऱ्या विविध उपक्रमांसह उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये मतदानाचे महत्त्व पटवून देणे, लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागासाठी प्रेरित करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. लोकशाही बळकटीसाठी २२ कर्मचारी व १०० विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांना स्वच्छ, निर्भय, निष्पक्ष व जबाबदार मतदान करण्याची शपथ देण्यात आली. मतदान हा लोकशाहीचा कणा असून प्रत्येक नागरिकाने कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले. हा उपक्रम संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यावर्षीची My India My Vote ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान जागरूकतेविषयी आपले विचार व्यक्त करत लोकशाही प्रक्रियेत युवकांचा सहभाग किती महत्त्वाचा आहे, हे अधोरेखित केले.

कार्यक्रमात १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवावे, तसेच निर्भयपणे



मतदान करून लोकशाही अधिक सक्षम करावी, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रा. तांबे यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. गडदे यांनी केले असून शहाणे, निमगावकर व तांबे यांनी सहकार्य केले. शिक्षक शहाणे, सलीम, गडदे, तांबे, दुधाळ, राठोड यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेतृत्व डॉ. राहुल खडके यांनी केले. उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

लोकशाही बळकटीसाठी घेतलेली शपथ– राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विद्यार्थ्यांना स्वच्छ, निर्भय व निष्पक्ष मतदान करण्याची शपथ देण्यात आली. मतदानाद्वारे लोकशाही सक्षम करण्याची जबाबदारी युवकांची असून, कोणत्याही आमिषाला बळी न पडता मतदान करण्याचा निर्धार यावेळी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

१८ वर्षांवरील युवकांना आवाहन– १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने मतदार यादीत नाव नोंदवावे, तसेच लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले. चू खपवळर चू तेंश या संकल्पनेद्वारे युवकांमध्ये मतदान जागरूकता वाढवण्यावर भर देण्यात आला.

### युवकांनीच लोकशाही मजबूत करावी– डॉ. आदित्य सारडा


**आदित्य पॉलिटेक्निकचे संचालक डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, लोकशाहीची खरी ताकद युवकांमध्ये आहे. मतदान हा केवळ हक्क नसून ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आजचे विद्यार्थी उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांनी निर्भय, निष्पक्ष आणि प्रामाणिक मतदान केल्यासच देशाची लोकशाही अधिक सशक्त होईल. 'My India My Vote' ही संकल्पना युवकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करणारी असून अशा उपक्रमांमुळे लोकशाही मूल्ये अधिक बळकट होतील.**



*डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी येथे तुलसी शैक्षणिक समूह बीड येथे चालु असलेल्या विविध कोर्सेस ,अभ्यासक्रम व निवासी वसतिगृह सुविधांची माहिती १० वी व १२वीच्या विद्यार्थ्यांना देताना. डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी या ठिकाणी तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या सर्व कोर्सेसची सविस्तर माहिती इयत्त १० वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांना दिली माहिती देताना आ. प्रा. अर्जुन राठोड सर प्राचार्य डी डी राऊत प्रा. सुप्रिया ससाने , आणि डॉ.विकास वाघमारे यांनी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन तसेच तुलसी संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय तुम्ही आयटी सेक्टर ,फॅशन डिझाईन, जी एन एम नर्सिंग कॉलेज तसेच अच्युर्स अकॅडमी विषयी ची सविस्तर माहिती व सर्व आयटी ,फॅशन डिझाईन, नर्सिंग या सर्व कॉलेज विषयी आणि त्या कोर्स मध्ये असणाऱ्या जॉबच्या अपारच्युनिटीळज संबंधी सविस्तर मार्गदर्शन केले.या सर्व उपक्रमा बाबत प्राचार्य वाय.बी.भोसले,पर्यवेक्षक लांडेसर व सर्व प्राध्यापक व शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले.*

# आदर्श जि.प. प्राथमिक शाळा तांदळवाडी (भि.) येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त भव्य स्नेहसंमेलन व गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न







**बीड । प्रतिनिधी**

आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मौजे तांदळवाडी (भि.) यांच्या वतीने २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणारा आणि तांदळवाडी गावाच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घालणारा हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात पार पडला. गावाच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा हा सोहळा ठरला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे प्रथम नागरिक सरपंच श्री. श्रीराम सांगुळे हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन गटविकास अधिकारी मा. श्री. अनिरुद्ध सानप यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत शिक्षकवृंदांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. तुकाराम जाधव, श्री. सिद्धेश्वर माटे सर, श्री. श्रीराम बहिर सर, श्री. विजय खोसे सर, श्री. दत्तात्रेय कवचट सर, श्री. संपत काशीद सर, श्री. आर. डी. जाधव सर, श्री. ढाकणे सर, श्री. तांदळे सर, श्री. विलास आहेर सर, पोलीस अधिकारी श्री. गणेश खाडे सर, श्री. किरण गीते सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय उपसरपंच श्री. अर्जुन केदार, माजी सरपंच श्री. राधाकिसन काजळे, माजी सरपंच श्री. बाळकिसन फड, शिक्षण समिती अध्यक्ष शेख बाबा मिया, श्री. भारत सांगुळे तसेच पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने पालक, ग्रामस्थ व नागरिक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मुक्तकंठाने कौतुक केले. या स्नेहसंमेलनात शाळेतील चिमुकल्या बालकलावंतांनी नृत्य, नाट्य, देशभक्तीपर गीत, भाषणे व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, कला व संस्कार यांचे सुंदर दर्शन घडले. प्रत्येक कलाकृती ही वाखाणण्याजोगी असून भविष्यात याच विद्यार्थ्यांपैकी एखादा बालकलावंत गावाचे व पंचक्रोशीचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन श्री. शामराव वनवे सर, श्री. रामेश्वर क्षीरसागर सर, श्री. सुधाकर राऊत सर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतलेल्या आदर्श शिक्षिका श्रीमती माधवी भंडारे मॅडम, श्रीमती अनिता नागरगोजे मॅडम, श्रीमती सुनिता सिरसवाल मॅडम, श्रीमती रंजना आमटे मॅडम यांचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री. सिद्धेश्वर सांगुळे (सहकार अधिकारी श्रेणी–२) यांनी केले. तर श्री. ज्ञानेश्वर कोठुळे सर यांनी केलेल्या उत्कृष्ट, ओघवत्या सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली. तांदळवाडी गावातील सांस्कृतिक चळवळीला चालना देणाऱ्या या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल सर्व शिक्षकवृंदांचे आयोजकांच्या वतीने मनः पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवणाऱ्या सर्व प्रमुख पाहुणे, पालक व ग्रामस्थांचे आभार मानण्यात आले.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव शिवणी ता.जि.बीड येथे जि.प शाळा येथे राष्ट्रभक्त, भारतरत्न,स्वर्गीय नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती साजरी करण्यात आली. व संस्थेचे सचिव यांनी नेताजी यांच्या देशभक्ती, स्वातंत्र्य लढा, कार्याबद्दल सर्व विद्यार्थी ना मार्गदर्शन केले. यावेळी उपाध्यक्ष संस्थेचे सचिव तेजस पवार, रोहन डोळस, विद्यार्थी, शिक्षक व गावकरी होते.*

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त शपथ ग्रहण

**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनुर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त मार्गदर्शन व शपथ ग्रहण साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कृष्णा जाधव हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. देशमुख आर. के. हे उपस्थित होते. नॅक समन्वयक डॉ. मकबुल सलीम हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.इनकर व्ही. एस. यांनी मतदान किती महत्त्वाचे आहे. हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. देशमुख आर.के. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय मतदार दिन साजरा





**बीड । प्रतिनिधी**

बाबूजी आवड महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिन आज साजरा करण्यात आला. या मतदार दिनासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रो. डॉ. अरुण राख उपस्थित होते. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए.चौरे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मतदान दिन कार्यक्रम संपन्न झाला. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी जागरूक मतदार आवश्यक असतो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेमार्फत दिलेला हा मतदानाचा हक्क लोकशाहीच्या बळकटीसाठी किती आवश्यक आहे. याचे महत्त्व डॉ.अरुण राख यांनी आपल्या मनोगत मध्ये व्यक्त केले.

महाविद्यालयाचे नोडल अधिकारी प्रा .आनंद घोंगडे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नव मतदार फॉर्म लवकरात लवकर भरून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी करिता निष्पक्षपणे मतदान करण्याचे आव्हान केले. याप्रसंगी प्रो. अरुण राख यांनी मतदारांना शपथ दिली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा .आनंद घोंगडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रसंगी डॉ. वैशाली आहेर ,डॉ. भगवान सांगळे डॉ.अशोक डोळस ,डॉ.अभिमन्यू ढोरमारे ,डॉ.अजयकुमार पालवे,प्रा. शरद बोडके, प्रा. विजयकुमार मस्के, प्रा .संदीप कराड प्रा.विनोद चिमटे इत्यादी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश–४, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : ९३/२०२५**

अर्जदार–**१. नारायण पि. सर्जेराव सुपेकर, वय ४२ वर्षे, धंदा : शेती २. पुजा पि. नारायण सुपेकर, वय १६ वर्षे, ३. समर्थ पि. नारायण सुपेकर, १३ वर्षे, सर्व रा. मु.पो. साक्षाळपिंप्री, ता. जि.बीड**

विरूध्द

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

मागणी – अज्ञानाचे पालनकर्ता म्हणुन नियुक्ती करण्याची परवानगी मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार– १. नारायण पि. सर्जेराव सुपेकर, वयः ४२ वर्षे, धंदा : शेती, २ . पुजा पि. नारायण सुपेकर, वय : १६वर्षे, ३. समर्थ पि. नारायण सुपेकर, १३ वर्षे, सर्व रा. मु.पो. साक्षाळपिंप्री, ता. जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदार क्रं १ यांची मुलगी नामे **पुजा पि. नारायण सुपेकर, वयः १६ वर्षे व मुलगा नामे समर्थ पि. नारायण सुपेकर, वय : १३ वर्षे,** यांचे नावावरील मौजे साक्षाळपिंप्री, ता. जि. बीड येथिल गट क्रं ६०५ मधिल क्षेत्र ०० हे. १३ आर हि सदर मिळकत अज्ञानांचे नावे असलेली विक्री/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०८/०५/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **प्रकरणातील पुढील तारीख : २१/०६/२०२५.**

**अर्जदारातर्फे वकिल – ॲड. एल. आर. गंगावणे, बीड.**

**आदेशावरून (स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधिक्षक**
**जिल्हर न्यायालय बीड**

शिक्का

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

दैनिक मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ ●

# मुख्यमंत्री देवाभाऊंनी धनंजय मुंडेंना दिलेल्या शब्दाची केली पूर्ती!

## परळी वैद्यनाथ येथील थर्मल च्या जागेत सोलार एनर्जी प्लांट उभारण्याची निविदा प्रसिद्ध ; मेगा सोलर प्रकल्प परळीच्या विकासात ठरणार मैलाचा दगड



**परळी वै. । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना विधानसभा सभागृहात दिलेल्या शब्दाची पूर्तता केली असून परळी वैद्यनाथ येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या निष्कासित झालेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेत मेगा सोलर प्रकल्प उभारण्यास शासनाने मंजुरी दिली असून पहिल्या टप्प्यात याठिकाणी ५० मेगा वॅट वीज निर्मिती क्षमता असलेला सोलर प्रकल्प उभारण्यात येत असून त्याची निविदा महानिर्मितीने प्रसिद्ध केली आहे. परळी येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या निष्कासित झालेल्या संच क्रमांक एक ते पाच च्या रिकाम्या जागेत ३५० मेगा वॅट वीज निर्मितीची क्षमता असलेला मेगा सोलर प्रकल्प उभारण्यात यावा अशी मागणी मागील अधिवेशनात धनंजय मुंडे यांनी विधानसभेत केली होती. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनंजय मुंडे यांची ती मागणी मान्य करून लवकरच मेगा सोलर एनर्जी प्रकल्प उभा करण्याचा शब्द दिला होता. या सोलार निर्मिती प्रकल्पाच्या उभारणीमुळे वीज निर्मितीसह परळी व परिसरात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती देखील होणार ▶▶ उर्वरित पान २ वर

# दर्जेदार बंधारे उभारुन पाण्याचा प्रश्न सोडवणार : अमरसिंह पंडित

## कुंभेजळगाव आणि राजपिंप्री येथील ३० लाख रुपये किंमतीच्या सिमेंट बंधाऱ्याचे उद्घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**

पाण्याचे दुर्भिक्ष असताना देखील कुंभेजळगाव, राजपिंप्री आणि परिसरातील शेतकरी उत्तम पद्धतीने शेती करत असल्याने आपण प्रभावित झालो, त्यामुळे अशा दुष्काळी भागाची निवड करुन पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी बंधारा उभारण्याचे काम आपण हाती घेतले आहे. बंधा-याचे काम दर्जेदार होईल याचा फायदा या



भागातील शेतकरी व नागरिकांना होईल. आगामी काळात गेवराई तालुक्यात २२ बंधारे उभारणार असल्याचे माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी सांगितले. जिल्हा नियोजनातून कुंभेजळगाव येथील १५ लाख रुपये किंमतीच्या सिमेंट बंधारा बांधकामांचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

जिल्हा नियोजनातून कुंभेजळगाव आणि राजपिंप्री येथील ३० लाख रुपये किंमतीच्या सिमेंट बंधारा बांधकामांचे उद्घाटन माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, माजी सभापती कुमारराव ढाकणे, जगन्नाथ काळे, जिल्हा परिषद सदस्य फुलचंद बोरकर, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष कालिदास नवले, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे, शिवाजीराव दिवाण, राधाकिसन शेंबडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, कुंभेजळगाव, राजपिंप्री या भागातील बंधारे आणि ईतर विकास कामामुळे या भागातली ▶▶ उर्वरित पान २ वर

# 14 वर्षाच्या मुलीचा गेवराई मधे बालविवाह

## AHTU ने मुलीला ताब्यात घेवून पोस्टे गेवराई येथे केला गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

याबाबत सविस्तर बातमी अशी की, दिनांक २३/०१/२०२६ रोजी सकाळी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या प्रभारी अधिकारी, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दिनांक २३/१२/२०२५ रोजी पिंपळादेवी ता. जि. बीड येथे एका १४ वर्षाच्या मुलीचा बालविवाह झाला आहे व ज्याच्याशी विवाह झाला आहे तो व्यक्ती ही पिंपळादेवी मधलाच आहे. त्यावरून, -ऋ्ण टीम पिंपळादेवी गावात दाखल झाली. मिळालेल्या माहितीनुसार बालविवाह झालेल्या घरी टीम गेली असता, बालविवाहित पीडित




मुलगी घरी मिळून आली. तिला विश्वासात घेवून तिचे समुपदेशन केले व तिला तिच्या लग्नाबाबत विचारपूस केली असता, तिने सांगितले की, तिचा विवाह दिनांक २३/१२/२०२५ रोजी साई सिध्दी हॉल गेवराई शहर येथे, सिद्धार्थ मधुकर आवारे वय २७ वर्षे रा. पिंपळादेवी ता. जि. बीड याच्यासोबत झाला आहे. सदर पीडित मुलगी मधुकर आवारे यांच्या घरात मिळून आल्याने, त्यांना दोघांना ताब्यात घेतले व पुढील कारवाई साठी पोस्टे गेवराई येथे हजर केले. तसेच पीडित मुलीचे आईवडील व सिद्धार्थ आवारे यांना फोन करून पोस्टे गेवराई ला हजर होण्यास सांगितले. गेवराई येथे गेल्यावर ▶▶ उर्वरित पान २ वर

# जगदीश गुरखुदे हे सर्वात जेष्ठ नगरसेवक: डॉ.सारिका क्षीरसागर

## वॉर्ड क्र ७ मध्ये आयुष्यमान कार्डचे मोफत वाटप



**बीड । प्रतिनिधी**

गरीब आणि मध्यम वर्गीयांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांनी आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत मोठा दिलासा दिला असून ही योजना प्रत्येक गरजवंतापर्यंत पोहचवण्यासाठी जेष्ठ नगरसेवक जगदीश गुरखुदे आणि सौ.भाग्यश्री सागर देशपांडे यांचा उपक्रम कौतुकास्पद असून नगर परिषदेत जेष्ठ म्हणून जगदीश गुरखुदे यांचे सदैव मोलाचे मार्गदर्शन लाभते असे गौरवोद्गार न प तील भाजप गटनेत्या डॉ.सारिका क्षीरसागर यांनी काढले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोणताही धार्मिक जातीय भेदभाव न करता संपूर्ण देशवासियांसाठी कल्याणाची विविध योजना सुरू केल्या असून त्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# रेल्वे ट्रॅकने शेतकरी दोन भागांत विभागले; दक्षिण-उत्तर दोन्ही बाजूंना शेतपोच रस्ता करण्यात यावा: संदीप शिंदे पाटील



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील चिंचवण रोड पासून सरकार खोरी तांडा दरम्यान तयार करण्यात आलेल्या नवीन रेल्वे मार्गामुळे परिसरातील शेतकरी, मजूर व नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. रेल्वे ट्रॅकमुळे शेतजमिनी अक्षरशः दोन भागांत विभागल्या गेल्या असून अनेक शेतकऱ्यांची शेती रेल्वे ट्रॅकच्या दक्षिण व उत्तरेकडील दोन्ही बाजूंना पडलेली आहे. आज शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी कोणताही अधिकृत व सुरक्षित मार्ग उपलब्ध नाही. परिणामी शेतकरी, महिला, वृद्ध तसेच मजूर वर्ग रेल्वे ट्रॅक ओलांडून शेतीकडे ये-जा करत आहेत. ही परिस्थिती केवळ शेतीची नसून ती मानवी सुरक्षिततेचा, सामाजिक न्यायाचा व प्रशासनाच्या संवेदनशीलतेचा प्रश्न बनली आहे.

रेल्वे ट्रॅकच्या केवळ एका बाजूस रस्ता केल्यास समस्या सुटणार नाही. कारण अनेक शेतकऱ्यांची शेती दक्षिण व उत्तर दोन्ही बाजूंना आहे. त्यामुळे रेल्वे ट्रॅकच्या दोन्ही बाजूंनी शेतपोच रस्ता करण्यात यावा, ही परिसरातील शेतकरी व नागरिकांची एकमुखी मागणी आहे. अन्यथा शेतकऱ्यांवर कायमस्वरूपी अन्याय होईल. या गंभीर सामाजिक प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी वडवणी येथील सामाजिक कार्यकर्ते संदीप नारायणराव शिंदे यांनी बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्याकडे निवेदन सादर करून, रेल्वे विभाग व प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करावा अशी मागणी केली आहे. शेतपोच रस्ता हा केवळ सोयीचा विषय नसून तो शेतकऱ्यांच्या जीवनाचा, ▶▶ उर्वरित पान २ वर

# इथेनॉल टँकरला भीषण अपघातानंतर मोठी आग



**गेवराई । प्रतिनिधी**

सोलापूरहून- छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या इथेनॉल टँकरचा गेवराई बायपास रोडवर भीषण अपघात होऊन मोठी आग लागल्याची घटना घडली. ही घटना शुक्रवारी मध्यरात्री सुमारे २ वाजताच्या सुमारास घडली. अपघाताची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले. सुदैवाने या अपघातात जिवीतहानी झाली नाही. असे बोलले जात आहे.

# पात्रुड मध्ये ३३ किलो गांजासह एकास अटक

**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे सापळा रचून एका इसमाला तब्बल ३३ किलो गांजासह रंगेहाथ पकडले. या कारवाईत गांजा आणि दुचाकीसह एकूण ७ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एक इसम बजाज मोटार सायकलवरून गांजा विक्रीसाठी पात्रुड (ता. माजलगाव) येथे येत आहे. या माहितीवरून पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे यांच्या पथकाने पात्रुड परिसरात सापळा लावला. संशयित दुचाकी येताच पोलिसांनी अडवून झडती घेतली. त्याच्याकडे असलेल्या सॅक मध्ये ३३ किलो गांजा मिळून आला.



पकडलेल्या आरोपीचे नाव सय्यद अत्तार रहेमान सय्यद नौमान वय ३५ वर्षे, रा. परळी, जि. बीड असे आहे. आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून गांजा आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ७ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७/२०२६ नुसार कलम ८ (क) आणि २० (ब) गुंगीकारक औषधी द्रव्य, मनो व्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ करत आहेत.ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, ▶▶ उर्वरित पान २ वर

# रेल्वे भुसंपादन, रखडलेले कामे वेळेत पुर्ण करा: खा.बजरंग सोनवणे

## रेल्वे अधिकाऱ्यांना सुचना: अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचा घेतला आढावा, अपूर्ण कामे, भूसंपादन व नागरिकांच्या अडचणींवर सखोल चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गांवरील बीडपासून पुढे रखडलेले रेल्वे मार्गाचे कामे, भुसंपादनाची २० प्रकरणे वेळेत पुर्ण करा, रेल्वे मार्गाशेजारील शेतकऱ्यांच्या समस्या तातडीने सोडवा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात मंगळवारी (दि.२४) बीड रेल्वे विभागाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गासह विविध महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अहिल्यानगर रेल्वे विभागाचे मुख्य अभियंता लोळगे, याच बरोबर विविध विभागाचे विभागप्रमूख उपस्थित होते. अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गावरील विद्युत जोडणी, सिग्नल वर्क आणि बीड ते वडवणी तसेच वडवणी ते सिरसाळा व सिरसाळा ते परळी या टप्प्यांतील कामांची सद्यस्थितीबाबत सविस्तर आढावा घेतला. बीड ते परळी रेल्वेमार्गात २० ठिकाणची भुसंपादन प्रक्रिया सुरू आहे. सदरील प्रकिया तातडीने पुर्ण करा, या कामात हयगय करू नका, अशा सुचना ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● मालधक्का तातडीने कार्यन्वीत करा

आष्टी तालुक्यात नियोजीत मालधक्का असून तो अद्याप प्रत्यक्षात सुरू झाला नाही. व्यपारी, शेतकरी, उद्योजकांच्या दृष्टीने हा मालधक्का अत्यंत महत्वाचा आहे. तो तातडीने सुरू करावा, शिवाय बीड आणि परळीतही मालधक्के करावे लागणार आहेत. त्यासाठी रेल्वे प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी, अशा सुचना देखील खा.सोनवणे यांनी दिल्या.

### ● या महत्वाच्या मागण्यावर चर्चा

बीड-नगर-मुंबई व बीड-नगर-पुणे इंटरसिटी सेवा चालू करणे, बाशी नाका येथे अतिरिक्त रेल्वे थांबा देणे, बीडमधील पालवन व बाशी नाका स्थानकासाठी कार पार्किंग, सर्व प्रमुख स्थानकांना लागणारी वीज उपलब्ध करणे, सोलार ऊर्जा निर्मिती प्रकल्प तयार करणे, आष्टीतील काकडवाडी (पिंपळा) लगतच्या रेल्वे क्रॉसिंग पुलाकरिता वाढीव निधी देणे अशा विविध महत्वाच्या मागण्यावर चर्चा करण्यात आली.

### ● अभियंत्याबद्दल नाराजी

नगर-बीड-परळी रेल्वे मार्गातील शिरूर येथील रेल्वे पटरी खाली नाल्यावर तिरका पूल बांधल्यामुळे विकासनगर वस्तीवर जाण्या-येण्यासाठी असणारा दळणवळणाचा रस्ता बंद झाला आहे, असे म्हणत खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वेचे अभियंते असे कसे काम करत आहेत, अनेक ठिकाणी तिरके पुल बांधले, सरकारचा निधी विनाकारण खर्च केला असे म्हणत नाराजीही व्यक्त केली.

### ● परळी, नवीन रेल्वे मार्गावर चर्चा

परळी-परभणी दुहेरीकरणासाठी होत असलेले जमीन अधिग्रहण व असलेली घरे रेल्वेसाठी संपादित न करता परळी थर्मल परिसरात मोकळी जागा शोधावी, असा पर्याय खा.सोनवणे यांनी शोधला, तर धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण कामाच्या स्थितीबाबत सविस्तर चर्चा करू प्रकल्प फिजिबल होईल यासाठी प्रयत्न करावेत, असेही अधिकाऱ्यांना म्हटले.

### ● बैठकीला शेतकऱ्यांचीही उपस्थिती

रेल्वे मार्गावरील हिवरसिंगा, मलकाचीवाडी-रोकडेश्वरनगर, खोकरमोहा, बरगवाडी-घुगेवाडी, शिरापूर धुमाळ येथील रेल्वेच्या पुलाजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. तर काही ठिकाणी ज्या गावचे शेत रेल्वेत गेले त्या गावचे नाव रेल्वे स्थानकाला न देता दुसरेच दिले, अशा तक्रारी घेवून शेतकरी, नागरिक बैठकीत दाखल झाले होते.